ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language
Monthly Peer Reviewed International Research Journal

Special Issue June - 2016




☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Sanjay J. Kothari
Editor - Dr. Dinesh W.Nichit

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | प्रा. डॉ. माधव मारुती भोसले | फेसबुक आणि मराठी कविता | 16 |
| 30 | प्रा.कदम संभाजी धोंडीराम | संत तुकारामांच्या अभंगातील समाजप्रबोधन | 21 |
| 31 | प्रा. डॉ. विशाखा वंजारी | आशा बगे यांच्या 'भूमी' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन | 28 |
| 32 | प्रा.लीना केदारे | जागतिकस्त्रीवादी समीक्षक | 34 |
| 33 | मंगेश अशोकराव रणदिवे, | गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेवरील आघाडी सरकारांचा प्रभाव : एक चिकित्सक अध्ययन | 39 |
| 34 | प्रा. डॉ. विजय रैवतकर | विजय तेंडुलकरांच्या नाटकांतील वाङ्मयीन विद्रोह | 43 |
| 35 | कु.कविता निरंजन खरात | मानवाधिकार व पाली साहित्यातील स्त्री शिक्षण | 46 |
| 36 | प्रा. वर्षा गणगणे | महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती आंदोलने आणि चळवळी | 49 |
| 37 | प्रा. तिलकचंद जि. धोटे | जागतिक तापमान वाढ व हवामानातील बदल | 54 |
| 38 | प्रा. मोनिका एन.मानापूरे<br>प्रा. डॉ.एन.आर.दिक्षित | वर्धा शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांनी गृह निर्माण कर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्याचे मुल्यमापन | 58 |
| 39 | डॉ. वंदना पळसापुरे | देशीवाद आणि मराठीतील स्त्रियांचे कादंबरीलेखन | 61 |
| 40 | प्रा.शिल्पा नेवे | वारकरी संतसाहित्यातील तत्वज्ञान | 64 |
| 41 | प्रा. मनोहर एस. कलोडे<br>डॉ.धनंजय विरुळकर | विदर्भातील आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता विशिष्ट शारीरिक क्षमता चाचणीची निर्मिती आणि प्रमाणिकरण – एक अभ्यास | 69 |
| 42 | प्रा.डॉ. वाय.एम. साळूंके | रविंद्रनाथ टागोरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य | 72 |
| 43 | प्रा. उत्तम करमाळकर | प्राचार्य शिवाजीवराव भोसले यांच्या वैचारिक जगतातून मानवी हक्काचे दर्शन | 76 |
| 44 | प्रा. डॉ. पद्माकर मा. टाले | पाणी व्यवस्थापन - काळाची गरज | 81 |
| 45 | प्रा. जी. डी. रूपवते, | कॉ. माधवराव गायकवाड यांचे कामगार व शेतकरी या घटकांविषयीचे योगदान | 84 |
| 46 | प्रा. विनोद यू. भालेराव | कथाकार शंकर पाटील | 86 |
| 47 | प्रा.शोभा संभोजी | स्त्रीभ्रूणहत्या : 21 व्या शतकातील आव्हान | 88 |
| 48 | प्रा. डॉ. सौ. यु.आर.पाटील | केतकरांच्या कादंबरीतील मिश्रविवाह: एक दृष्टिक्षेप | 92 |
| 49 | प्रा. व्ही. एस. यादव | डॉ. आंबेडकर आणि भारतीय लोकशाही | 96 |
| 50 | प्रदीप औजेकर, | दत्त संप्रदाय: वाङ्मय व स्वरूप | 99 |
| 51 | डॉ. निलेश र.निंबाळकर | मानवी हक्क आणि भारतीय व्यवस्थेसमोरील आव्हाने | 103 |


Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

ISSN - 2278-9308

# विजय तेंडुलकरांच्या नाटकांतील वाङ्मयीन विद्रोह

प्रा. डॉ. विजय रैवतकर
सहायक प्राध्यापक महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली

१९६० हे वर्ष मराठी नाटकाच्या दृष्टीनेच नव्हे तर एकूणच मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने संस्मरणीय आहे. या काळात नाटकच नव्हे तर काव्य, कथा, कादंबरी इत्यादी बहुतांश वाङ्मयप्रकारांमध्ये या वर्षापासून मूलभूत परिवर्तन झालेले दिसून येतात. नाटकाच्या संदर्भात हे वर्ष अतिशय महत्त्वाचे असेच ठरले. १९६० पासून सामान्यत: प्रायोगिक रंगभूमी आणि प्रायोगिक नाटक या संज्ञांचा वापर होऊ लागला. विजय तेंडुलकरांनी त्यांच्या नाट्यलेखनाची सुरुवात सामान्यत: १९५५ पासून केली. त्यांच्या नाटकांनी एकूणच मराठी रंगभूमी व नाट्यसृष्टीत परिवर्तन घडवून आणले. मराठी नाट्यवाङ्मयाला एक नवी दिशा देण्याचे कार्य तेंडुलकरांनी त्यांच्या नाटकांद्वारे केले.

तेंडुलकरांनी पारंपरिक नाटकांचा अस्वीकार केला यातून त्यांच्या नाट्यवाङ्मयातील वाङ्मयीन विद्रोह आपल्या लक्षात येते. त्यांनी त्यांच्या नाट्यलेखनातून वाङ्मयीन विद्रोह केला, पण त्यांच्या आधीही मराठी नाट्यक्षेत्रात वाङ्मयीन विद्रोहाची पानेमुळे काही अंशी दिसत होती. नाट्यमन्वंतर ते तेंडुलकरांची नाटके प्रत्यक्ष रंगमंचावर येईपर्यंतच्या काळात बऱ्याच नाटककारांनी मराठी नाट्यसृष्टीची परिमाने बदलविण्याचा प्रयत्न केला होता. या कालखंडात वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, मधुसूदन कालेलकर, पु. ल. देशपांडे, बाळ कोल्हटकर, शं. गो. साठे, पुरुषोत्तम दारव्हेकर आदी नाटककारांचे प्राबल्य जाणवते; पण नाट्यसृष्टीत जी स्थितिशीलता निर्माण झालेली होती त्याचा परिणाम ह्या नाटकांवर झालेला होता. त्यांचे नाट्यलेखन त्या काळातील सामाजिक, कौटुंबिक आणि राजकीय प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये अडकले होते. रूढार्थाने परंपरापूजन हा त्यांच्या नाटकांचा धर्म होता. त्यांच्या नाट्यलेखनाचा साचा पारंपरिक पद्धतीचाच होता. कृत्रिम संवाद, आलंकारिक भाषा, तत्त्वज्ञान सांगण्याचा आव, साचेबंद रचना, विषयाला वरवरचा स्पर्श अशी त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्य होती. या नाटककारांजवळ समग्र नाट्यदृष्टी व सर्वंकष जीवनदृष्टी नव्हती. एखादा प्रसंग किंवा एखादे व्यक्तिचित्रण, त्यातील मानसिक संघर्ष ते रंगवतात पण समग्र जीवनाला आकलून व्यक्ती आणि समाज यांच्या गाभ्याला हात घालून रसिकांना संपूर्णपणे अंतर्मुख करण्याची क्षमता नाही. त्यांच्यात चमत्कृतीचा मोह आहे. परंतु अस्सल पारदर्शिता आणि कमालीची भेदकता मात्र दिसत नाही. हे नाटककार प्रतिभाशून्य नाहीत पण त्यांच्या स्वत:च्या मर्यादा त्यांनी पाळल्या आहेत. सामाजिक समस्या आणि त्यावरील भाष्य यावर ते थांबताना दिसतात. एकूणच मानवी जीवनातले द्वंद्व आणि मानवी जीवनातील सुप्त क्रौर्य यांचा वेध हे नाटककार घेताना दिसून येत नाही. प्रसिद्धी, लोकप्रियता आणि रंजनानुगामित्व या त्यांच्या मर्यादांमुळे मराठी नाट्यसृष्टीत आमुलाग्र परिवर्तन झालेले दिसत नव्हते. या नाटककारांनी सामाजिक भान जोपासले होते मात्र पुरेसे बळकट नव्हते, कारण सामान्य मध्यमवर्गीय अभिरुचीचे भान या नाटककारांना असल्यामुळे त्यांच्या जीवनातील तथाकथित समस्या अतिशय प्राथमिक पातळीवर नाटकांत डोकावल्या, पण त्यांच्या मुळाशी जाण्याची अंतर्भेदी दृष्टी हे नाटककार दाखवू शकले नाहीत. या नाटककारांनी स्त्रियांचे प्रश्न हाताळले परंतु त्यात मूलगामी दृष्टीचा अभाव जाणवतो. बोधवादी रंजनपर वृत्तीमुळे वास्तवदर्शी नाट्यलेखनाची क्षमता हे नाटककार दाखवू शकले नाहीत. सामान्य जीवनानुभिरुचीच्या पोषणाकरिता सामान्य करमणूकप्रधान नाटके ह्यातील बहुतांशी नाटककारांनी लिहिली. नाट्यलेखनाच्या अशा वातावरणात विजय तेंडुलकरांनी नाट्यलेखन केले व त्यांनी मराठी नाट्यसृष्टीची परिमानेच बदलवून टाकली.

विजय तेंडुलकरांनी त्यांच्या नाट्यलेखनातून पारंपरिक नाटकांविरुद्ध विद्रोह करून आपल्या उत्कट संवेदनशीलतेच्या बळावर तत्कालीन वास्तवाबद्दलच्या चुकीच्या कल्पनांना आणि निष्ठांना झुगारण्याचे महत्त्वाचे कार्य केले. नाटक हा विशुद्ध कलाप्रकार असून मनोरंजन व अर्थार्जन या अतिशय सामान्य हेतुपेक्षा नाटकाचा हेतू वेगळा



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College
Armori, Dist. ...oli